## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८.
## शिकाऊ उमेदवार नेमणूक
## जाहिरात प्रकटन सन २०२१-२२

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थायी आस्थापनेवर शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये विहित प्रशिक्षण कालावधी करिता मा.अंशकालीन प्राचार्य, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, व्दारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पिंपरी चिंचवड, पुणे-१९ यांनी पत्र क्र.औप्रसंपिंचिं/शिप्रया/२०१८-१९/१८७५, दिनांक २४/०८/२०१८ अन्वये स्थित केलेल्या खालील पदांच्या व्यवसायासाठी आय.टी.आय.शैक्षणिक अर्हतेनुसार व पदांचे संख्येनुसार अर्हताधारक शिकाऊ उमेदवारांकडून Online पध्दतीने **www.pcmcindia.gov.in** या संकेतस्थळावर अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | व्यवसायाचे नाव | पदांची संख्या | अनु. जाती | अनु. जमाती | वि. जा. (अ) | भ. ज. (ब) | भ. ज. (क) | भ. ज. (ड) | वि. मा. प्र. | इ. मा. व. | आ. दु. घ. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आरेखक स्थापत्य (Draughtsman Civil) | ०६ | १ | ० | १ | | | | ० | १ | १ | २ |
| २ | भूमापक (Surveyor) | ०६ | १ | ० | १ | | | | ० | १ | १ | २ |
| ३ | पासा (PASSA) | ६३ | १ | ४ | ० | १ | ३ | २ | २ | १४ | १० | २६ |
| ४ | नळ कारागीर (Plumber) | २५ | ३ | १ | ३ | | | | ० | ५ | ३ | १० |
| ५ | वीजतंत्री (Electrician) | २५ | ३ | १ | ३ | | | | ० | ५ | ३ | १० |
| ६ | तारतंत्री (Wireman) | २५ | ३ | १ | ३ | | | | ० | ५ | ३ | १० |
| ७ | पंप चालक तथा यांत्रिक (Pump Operator Cum Mechanic) | १५ | २ | १ | २ | | | | ० | ३ | १ | ६ |
| ८ | यांत्रिक मोटारगाडी (Mechanic Motor Vehicle) | ०५ | १ | ० | ० | | | | ० | १ | १ | २ |
| ९ | माळी (Gardner) | १५ | २ | १ | २ | | | | ० | ३ | १ | ६ |
| १० | वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ (रेडिओलॉजी) (MLT – Radiology) | ०३ | १ | ० | ० | | | | ० | १ | ० | १ |
| ११ | वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ (कार्डीओलॉजी ॲन्ड फीजीओलॉजी) (MLT – Cardiology and Physiology) | ०२ | ० | ० | ० | | | | १ | ० | १ | २ |
| १२ | वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ (पॅथॉलॉजी) (MLT – Pathology) | ०९ | १ | १ | १ | | | | ० | २ | १ | ३ |
| | एकूण | १९९ | | | | | | | | | | |

| अ. क्र. | व्यवसायाचे नाव | प्रशिक्षण कालावधी | गुणानुक्रम वर्गवारी (Eligibility Criteria) | विद्यावेतन र.रू. (प्रति माह) |
|---|---|---|---|---|
| १ | आरेखक स्थापत्य (Draughtsman Civil) | १ वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील आरेखक स्थापत्य कोर्स उत्तीर्ण उत्तीर्ण (ITI Pass) | ८,०५०/- |
| २ | भूमापक (Surveyor) | १ वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील सर्व्हेअर कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) | ७,७००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | पासा (PASSA) | १ वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील कोपा-पासा कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) | ७,७००/- |
| ४ | नळ कारागीर (Plumber) | १ वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील प्लंबर कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) | ७,७००/- |
| ५ | वीजतंत्री (Electrician) | १ वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील इलेक्ट्रिशियन कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) | ८,०५०/- |
| ६ | तारतंत्री (Wireman) | १ वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील वायरमन कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) | ८,०५०/- |
| ७ | पंप चालक तथा यांत्रिक (Pump Operator Cum Mechanic) | १ वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील पंप ऑपरेटर कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) | ७,७००/- |
| ८ | यांत्रिक मोटारगाडी (Mechanic Motor Vehicle) | १ वर्ष | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील मेकॅनिक मोटर व्हेईकल कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) | ८,०५०/- |
| ९ | माळी (Gardner) | १ वर्ष | १० वी उत्तीर्ण (10th Pass) | ६,०००/- |
| १० | वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ (रेडिओलॉजी) (MLT – Radiology) | ६ महिने | १२ वी शास्त्र (फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजी सह) उत्तीर्ण (12th Science Pass) | ७,०००/- |
| ११ | वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ (कार्डीओलॉजी ऍन्ड फीजीओलॉजी) (MLT – Cardiology and Physiology) | ६ महिने | १२ वी शास्त्र (फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजी सह) उत्तीर्ण (12th Science Pass) | ७,०००/- |
| १२ | वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ (पॅथॉलॉजी) (MLT – Pathology) | ६ महिने | १२ वी शास्त्र (फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजी सह) उत्तीर्ण (12th Science Pass) | ७,०००/- |

अटी व शर्ती-

१) उमेदवाराने apprenticeshipindia.org (NSDC PORTAL) संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे.

२) सदरच्या नेमणूका ह्या फक्त शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ नुसार विहित केलेल्या प्रशिक्षण कालावधीसाठी रिक्त होणा-या जागेवर केल्या जाणार आहेत. शिकाऊ उमेदवार अधिनियमानुसार प्रशिक्षण कालावधी संपुष्टात आल्यानंतर नेमणूक संपुष्टात येईल. अशा उमेदवारांचा महापालिकेतील कोणत्याही पदांवर हक्क राहणार नाही.

३) ज्या उमेदवाराने यापूर्वी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये apprenticeship केली आहे. अशा उमेदवारांची दुबार नेमणूक करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

४) apprenticeshipindia.org (NSDC PORTAL) संकेतस्थळावर करार नोंदणी केलेनंतर करार कोणत्याही परिस्थितीत संपुष्टात आणता येणार नाही.

५) अर्ज स्विकारण्याची मुदत संपल्यानंतर सर्व उमेदवारांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी आरक्षणानुसार मनपाचे अधिकृत वेब पोर्टलवर प्रसिध्द करणेत येईल.

६) Online अर्ज स्विकारण्याचा कालावधी दिनांक २५/१०/२०२१ रोजी सकाळी ९.४५ वा. पासून ते ०१/११/२०२१ रोजी सायंकाळी ६.१५ वा. पर्यंत राहील. अर्ज फक्त **www.pcmcindia.gov.in** या महापालिकेच्या संकेतस्थळावर (मुख्य पृष्ठ – भरती – शिकाऊ उमेदवार नेमणूक सन २०२१-२२) किंवा (मुख्य पृष्ठ – आमच्याबद्दल – नोकरीविषयक - शिकाऊ उमेदवार नेमणूक सन २०२१-२२) किंवा (HOME - ABOUT – Recruitment - Apprenticeship २०२१-२२) ऑनलाईन पध्दतीने

स्विकारणेत येतील. पोस्टाने अथवा हस्ते कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

७) नियुक्ती झालेनंतर उमेदवाराने वयाचे पुराव्यार्थ शाळा सोडल्याचा दाखला/ जन्मदाखला / अधिवास प्रमाणपत्र इ. पैकी एक, आधारकार्ड, २ फोटो, शैक्षणिक व तांत्रिक अर्हतेच्या संपूर्ण कागदपत्रांच्या मूळ प्रती तसेच छायांकित सत्यप्रतीच्या २ प्रतींसह दिलेल्या मुदतीत कार्यालयात रूजू होणेकामी हजर रहावे. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील असल्यास सक्षम अधिका-याने दिलेला जातीचा दाखला, जात पडताळणी प्रमाणपत्र इ. कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती सादर करणे आवश्यक आहे.

८) शासकीय ITI प्रशिक्षण, पॅथॉलॉजी, रेडिओलॉजी, कार्डीओलॉजी व गार्डनर याकरीता शैक्षणिक उत्तीर्ण वर्ष २०१९ ते २०२१ मधील असणे आवश्यक आहे. तसेच पासा या व्यवसायाकरिता मराठी टंकलेखन उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांना प्राधान्य राहील.

९) नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून ०८ दिवसांचे आत रूजू होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१०) पात्र उमेदवारांमधून निवड झालेल्या उमेदवारांना व्यवसायानुसार व गुणानुक्रमे कागदपत्रे तपासणीकामी पाचारण करण्यात येईल.

११) कागदपत्रे तपासणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची निकषाप्रमाणे निवडीसाठी कार्यवाही करण्यात येईल. यामधून जाहिरातीमध्ये नमूद केलेली व्यवसाय पदे गुणानुक्रमे व आरक्षणानुसार भरण्यात येईल.

१२) निवड केलेल्या उमेदवारांना मनपाने ठरवून दिलेल्या अटी/शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील. तसेच वरिष्ठांनी नेमून दिलेले कामकाज करण्यास नकार दिल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता नेमणूक रद्द करणेत येईल.

१३) उमेदवारांना कार्यालयीन कामकाजाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहील. त्यामध्ये कोणतीही सवलत अनुज्ञेय नाही.

१४) उमेदवारांची नेमणूक झालेनंतर बायोमेट्रीक पध्दतीने हजेरी नोंदविणे बंधनकारक राहील व हजेरी मस्टरवर रोजचे रोज स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय विद्यावेतन अदा केले जाणार नाही.

१५) नियुक्ती प्राधिकारी म्हणून मा.उप आयुक्त (प्रशासन) यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी शिकाऊ उमेदवार नेमणूक प्रशिक्षणार्थी कालावधी करण्याचा अधिकार राहील.

१६) शिकाऊ उमेदवार नेमणूक दिलेल्या उमेदवारांचे नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांचा प्रशिक्षणार्थी कालावधी समाप्त करण्यात येईल.

१७) शिकाऊ उमेदवार नेमणूक दिलेल्या उमेदवारांस प्रशिक्षण कालावधीमध्ये काही आजार उद्भवल्यास त्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१८) शिकाऊ उमेदवार नेमणूक दिलेल्या उमेदवारांस प्रशिक्षण पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा प्रकारचा इतर कोणताही व्यवसाय करण्यास प्रतिबंध राहील. तसेच त्यांना कामकाजासंबंधीची कागदपत्रे/ माहिती व आधारसामुग्री बाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

१९) शिकाऊ उमेदवार नेमणूक दिलेल्या उमेदवारांस विद्यावेतनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही सोयी सुविधा, हक्क व इतर आर्थिक लाभ देय राहणार नाही.

२०) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार पात्रता धारण न करणारा, गैरवर्तन करताना / दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास त्याची उमेदवारी / निवड रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाल्यानंतरही कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करणेत येईल.

२१) अपात्र/निवड न झालेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२२) शिकाऊ उमेदवार प्रशिक्षण कालावधीमध्ये उमेदवाराच्या चुकीमुळे मनपाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई करून घेणेत येईल.

२३) शैक्षणिक अर्हता, मागासप्रवर्ग, अंतिम परिक्षा वर्षातील गुण इ. संदर्भात अर्जामध्ये नमूद करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात माहिती स्पष्टपणे नमूद केले नसल्यास अशा अर्जाचा

विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केलेनंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

२४) कागदपत्रांचे तपासणीचे वेळी शैक्षणिक अर्हता धारण न करणे / अपुर्ण कागदपत्रे सादर करणारे / अर्जात चुकीची माहिती भरणे अशा उमेदवारांस निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

२५) अर्जदारांनी आपल्या वैयक्तिक माहितीत त्यांचा अचूक ई-मेल पत्ता व मोबाईल क्रमांक देणे बंधनकारक आहे.

२६) उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र उमेदवारांची यादी, निवेदने, निवड व प्रतिक्षा यादी व इतर सूचना ह्या वेळोवेळी **www.pcmcindia.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येतील. त्याबाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी प्रशिक्षण नेमणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. तसेच याबाबत उमेदवारांने समक्ष महापालिका कार्यालयामध्ये येवून विचारणा करू नये.

२७) अर्ज करणा-या उमेदवारांनी दि.०१/११/२०२१ पर्यंत ज्या व्यवसायाचे प्रशिक्षणासाठी अर्ज केला आहे. त्या पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व इतर सर्व अर्हता धारण करणे / अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

२८) नेमणूकीसाठी उपस्थित उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवास व इतर खर्च दिला जाणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी.

२९) केंद्रशासनाने निश्चित केलेल्या दरानुसार शिकाऊ उमेदवारांना विद्यावेतन अनुज्ञेय राहील.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याबाबतच्या व इतर सर्वसाधारण सूचना व सविस्तर जाहिरात महानगरपालिकेच्या **www.pcmcindia.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. याचे उमेदवारांनी काळजीपूर्वक अवलोकन करून अर्ज करावेत.

(सुभाष इंगळे)
उप आयुक्त (प्रशासन)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

क्रमांक : प्रशा/११/कावि/४५५/२०२१
दिनांक : २५/१०/२०२१

शिकाऊ उमेदवार ऑनलाईन भरती बाबत लिंक

http://103.224.247.134:8080/PCMCRecruitment/